2 लांब काय? गोल काय?

QRickit
0125CH02

आजूबाजूला बघा!

विद्याताईने सगळ्यांना गोलाकार बसायला सांगितले।



मुलांना वर्गात हा खेळायला सांगा. प्रत्येक मुलाने किमान दोन गोष्टी तरी सांगायच्या आहेत; एक लंबाकार आणि एक गोलाकार. दरवेळी त्यांनी वेगवेगळ्या वस्तू सांगाव्यात.एका वेळी एकाच मितीवर लक्ष केंद्रित करावे. काही वेळा मुलं परस्परविरोधी उदाहरणे देतील जसे कि एखादा काचेच्या ग्लासला लंबाकार तर दुसरा त्यालाच गोल म्हणेल. दोन्ही गोष्टी विचारात घ्याव्यात. मुलांना ते असे का सांगत आहेत याची करणे द्यायलाही सागा।

विचार करा आणि कृती करा

अ. गोलाकार वस्तूंचे ◯ आणि लंबाकार वस्तूंचे ▭ चित्र काढा।

© NCERT not to be republished

ब. समान आकाराच्या वस्तूंच्या जोड्या जुळवा।







क. चेंडूच्या आकाराच्या वस्तूंना बरोबरची खूण ✓ करा।



© NCERT not to be republished

ड. टोपीच्या आकाराच्या वस्तूंना ✓ बरोबरची खूण करा



इ. ग्लासच्या आकाराच्या वस्तूंना ✓ बरोबरची खूण करा



फ. आगपेटीच्या आकाराच्या वस्तूंना ✓ बरोबरची खूण करा

चला करू या

आपल्या आसपासच्या वस्तू वापरून घर, खेळणी, मनोरा, बस किंवा जे काही तुम्हाला आवडेल ते बनवा। यासाठी तुम्ही वह्या, पुस्तके, पेन्सिलींचे खोके, पाण्याच्या बाटल्या, जुने खराब झालेले खोके, वाढदिवसाच्या टोप्या अशा वेगवेगळ्या वस्तूंचा वापर करू शकता।

वर्गातील मुलांचे चार गट पाडा। प्रत्येक गटाला एक आकार द्या आणि त्या आकाराच्या दोन वस्तू मुलांना घेऊन यायला सांगा। अशा सगळ्या वस्तूंचे वर्गात प्रदर्शन मांडा आणि मुलांना त्यांच्या वस्तू आणि त्या वस्तू त्यांनी का निवडल्या याबद्दल बोलायला सांगा।

© NCERT not to be republished

शहाणी आजी

एक होती छोटीशी मेंढी। ती तिच्या आजीला भेटायला चालली होती

एका लांडग्याने त्या मेंढीला पाहिले आणि त्याला तिला पकडून खायचे होते।

कृपा करून मला आता नको खाऊ। मला माझ्या आजीकडे जाऊ दे। चांगलं जाडजूड होऊ दे।

ठीके, तू जाऊ शकतेस।

त्या छोट्याशा मेंढीने आपल्या आजीला त्या लांडग्याबद्दल सगळे सांगितले। आजीला एक युक्ती सुचली आणि तिने त्या छोट्या मेंढीला एका ढोलकीत भरले आणि ती ढोलकी तिच्या घराकडे ढकलून दिली।

ही गोष्ट वर्गात मोठ्याने वाचा आणि मुलांना त्यावर अभिनय करायला सांगा।

© NCERT not to be republished

ती ढोलकी वेगाने घरंगळायला लागली आणि लांडगा तिच्यामागे धावायला लागला।

पण लांडगा काही त्या छोट्या मेंढीला पकडू शकला नाही आणि ती सुरक्षितपणे तिच्या घरी पोचली।

ढोलकी का घरंगळत गेली ? याची कारणे मुलांना सांगायला सांगा। ढोलकीचा आकार आणि जंगलातला उताराचा किंवा चढणाचा रस्ता यांच्यातील संबंध यावर मुलांसोबत चर्चा करा।



चला खेळू या

चित्रात दाखविल्याप्रमाणे मुले कॅरम खेळत आहेत. तुम्हीही कॅरम खेळू शकता आणि आपल्या सोंगट्या कोपऱ्यातील जाळ्यांमध्ये कशा जातात हे समजून घेऊ शकता।

अ. घरंगळणाऱ्या वस्तुंपुढे ✓ हे चिन्ह करा आणि घसरणाऱ्या वस्तुंपुढे ✗ हे चिन्ह करा।

आपल्या आजूबाजूच्या परीसारतील वेगवेगळ्या वस्तू जमवून त्यातील कोणत्या घरंगळतात आणि कोणत्या घसरतात याचे निरीक्षण करा।

अशा कोणत्या वस्तू तुम्हाला मिळाल्या का ज्या दोन्हीही करतात ;घरंगळतात आणि घसरतात ? जर सापडल्या असतील अशा वस्तू तर त्यांची चर्चा करा।

मुलांना त्यांच्या घरातील किंवा शाळेतील अशा गोशी सांगायला सांगा ज्या घरंगळतात पण आणि घसरतात पण। वस्तूला घरंगळायला किंवा घसरायला कोणत्या गोष्टी कारणीभूत ठरतात याची चर्चा करा।

© NCERT not to be republished

विचार करा आणि कृती करा

खालील वस्तू घरंगळतात , घसरतातकी दोन्ही करतात हे शोधा। ✓ किंवा ✗ हि चिन्हं योग्य ठिकाणी करा।

वस्तु	घरंगळणे	घसरणे	घरंगळतात आणि घसरतात।

परियोजना कार्य

अ. एक चप्पल / बूट किंवा खाऊचा किंवा फळांचा पुठ्ठ्याचा खोका घ्या। या खोक्याच्या समोरच्या बाजूला चिरा पाडून तोंड, नाक , डोळे काढून त्याची कळसूत्री बाहुली तुमच्या पालक किंवा शिक्षकांच्या मदतीने तयार करा. या बाहुल्या वापरून तुमच्या आवडीच्या गोष्टी वर्गात सांगाए।

ब. वेगवेगळ्या वस्तू वापरून मनोरे बनवा. कोणत्या आकाराच्या वस्तू उंच आणि स्थिर मनोरे तयार करायला मदत करतात हे शोधून काढा।

क. चिकणमाती वापरून विविध आकार आणि वस्तू बनवा।

© NCERT not to be republished